जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 FEB 2020

तरुण भारत

# महापुरात विद्यापीठ सेवकांची सामाजिक बांधिलकी

## कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : विद्यापीठातर्फे प्रशस्तीपत्र देऊन गौरव



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शिक्षक व सेवकांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. सोबत परीक्षा संचालक गजानन पळसे आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सेवकांची विद्यापीठाबरोबरच समाजाप्रती असलेल्या बांधिलकीची प्रचिती गतवर्षी महापूरस्थितीच्या कालावधीत आली. माझ्या सहकाऱ्यांनी केलेल्या कार्याचा मला अभिमान वाटतो, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ यशस्वीरित्या आयोजित केल्याबद्दल सर्व समिती प्रमुख व सदस्य यांचे कौतुक आणि गतवर्षी महापूर काळामध्ये पूरग्रस्तांना विविध माध्यमांतून दिलासा देण्यासाठी झटलेले शिक्षक व प्रशासकीय सेवकांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी ते ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीचे प्रत्यंतर पूरकाळात आले. कोणत्याही कार्यालयीन आदेशाखेरीज केवळ सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून सर्व सहकारी विद्यापीठात उपस्थित होते. येथे सुरु केलेल्या शिबीरामध्ये सक्रिय योगदान दिले. अगदी रेल्वे स्टेशन, बस स्थानकावर अडकून पडलेल्या नागरिकांना शिबीरात दाखल केले. पडेल ती जबाबदारी पेलली. शहराला कॅम्पसवरून पाणीपुरवठा करण्याचे नियोजन असो, अगर जनावरांना वैरण उपलब्ध करणे असो, सर्वच पातळ्यांवर विद्यापीठातील सहकाऱ्यांनी एकदिलाने काम केले, याचा अभिमान वाटतो

ते म्हणाले, दीक्षान्त समारंभ यशस्वी करण्यासाठी सुद्धा विद्यापीठातील सर्व सहकाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले. त्याची पोचपावती राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या 'विश्वविद्यालय में अनुशासन दिखा' या लेखी प्रतिक्रियेतून आपल्याला मिळाली आहे. प्रा. भूषण पटवर्धन यांनीही अत्यंत नियोजनबध्द कार्यक्रम आयोजित केल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी प्रास्ताविक केले. सुनिता वांगीकर यांनी सुत्रसंचालन केले, डॉ विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

# महापुरात कर्मचाऱ्यांचे काम अभिमानास्पद

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; शिवाजी विद्यापीठातर्फे प्रशस्तिपत्रे देऊन कर्मचाऱ्यांचा गौरव

कोल्हापूर, ता. १२ : ''शिवाजी विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांचे विद्यापीठाबरोबरच समाजाप्रती असलेल्या बांधिलकीची प्रचिती महापुरात आली.

सहकाऱ्यांनी केलेल्या कार्याचा मला अभिमान वाटतो,'' असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ यशस्वी केल्याबद्दल सर्व समिती प्रमुख, सदस्य यांचे कौतुक, महापूर काळात पूरग्रस्तांना विविध माध्यमांतून दिलासा देण्यासाठी झटलेले शिक्षक, प्रशासकीय सेवक यांचा गौरव कार्यक्रम राजर्षी शाहू सभागृहात झाला.

डॉ. शिंदे म्हणाले, ''विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीचे प्रत्यंतर पूर काळात आले. कार्यालयीन आदेशाखेरीज सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून सर्व सहकारी विद्यापीठात उपस्थित होते. येथील शिबीरात सक्रिय योगदान दिले. रेल्वे स्टेशन, बस स्थानकावर अडकून पडलेल्या नागरिकांना शिबीरात दाखल केले. शहराला कॅम्पसवरून पाणीपुरवठा करण्याचे नियोजन असो, अगर जनावरांना वैरण देणे असो, सर्वच पातळ्यांवर विद्यापीठातील सहकाऱ्यांनी एकदिलाने काम केले''



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने महापूर काळात चालविलेल्या मदत, पुनर्वसन शिबिरात सक्रिय योगदान देणाऱ्या शिक्षक आणि सेवकांचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी परीक्षा संचालक गजानन पळसे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

ते म्हणाले, ''दीक्षान्त समारंभ यशस्वी करण्यासाठीही सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. त्याची पोचपावती राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या 'विश्वविद्यालय में अनुशासन दिखा' या लेखी प्रतिक्रियेतूनदिली आहे. प्रमुख पाहुणे प्रा. भूषण पटवर्धन यांनीही नियोजनबद्ध, देखणा कार्यक्रम आयोजित केल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.'

डॉ. शिंदे यांच्या हस्ते दीक्षान्त समारंभासाठी नियुक्त सर्व समितींचे प्रमुख, सदस्य आणि ज्यांनी मदतकार्यात सहभाग घेतला ते शिक्षक, सेवक यांना प्रशस्तिपत्रे प्रदान करुन गौरविले. परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी स्वागत केले. सुनिता वांगीकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

# तंजावरमध्ये मराठी संस्कृती भक्कम

## प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर टाइम्स टीम

'मराठ्यांनी दक्षिणेत दोनशे वर्षांहून अधिक काळ राज्य केले. यामुळे त्या परिसरात चित्र, शिल्प, संगीत, नाट्य, साहित्य, आदींवर मराठीचा ठसा आहे. विशेषतः तंजावरमध्ये मराठी संस्कृतीच्या पाऊलखुणा आजही घट्ट आहेत,' असे प्रतिपादन मराठी विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात बोलताना डॉ. नंदकुमार मोरे.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी 'तंजावरमधील मराठी संस्कृती' या विषयावर डॉ. मोरे बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, 'कोल्हापूरचे तंजावरशी घनिष्ठ संबंध होते. शहाजीराजांनी कर्तृत्वाने मराठीचा ठसा तंजावरमध्ये उमटवला. संपूर्ण भोसले कुळात ज्ञानाची लालसा आणि मोठा व्यासंग होता. यातूनच देशातील सर्वाधिक ८० मीटर लांबीचा शिलालेख तंजावरमध्ये कोरला गेला. मराठी भाषेतील अनेक हस्तलिखिते तिथे उपलब्ध आहेत. मराठी साहित्य आणि नाटकाच्या क्षेत्रात तंजावर प्रांत खूप प्रगत होता. मराठी नाटकांचा इतिहास विष्णुदास भावे यांच्यापासून सुरू होतो, असे मानले जाते. परंतु, त्याच्याही आधी दीडशे वर्षे तंजावरमध्ये नाटकांचे लेखन झाले आहे. त्याकाळातील समाज बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक असल्याचे पुरावे मिळतात.'

तंजावर परिसरातील सण आणि उत्सवांवर मराठी संस्कृतीचा ठसा ठळकपणे उमटल्याचे सांगून डॉ. मोरे म्हणाले, 'लग्नविधी, दिवाळी, दसरा, आदी सण महाराष्ट्रातूनच तिकडे गेले. तेथील मराठी बांधव आजही मोठ्या दिमाखात महाराष्ट्रीयन पद्धतीने सण साजरे करतात. तंजावरमधील मराठी भाषेचा तमीळ भाषेशी संपर्क आला. शिवकालीन मराठी भाषा आजही तिथे आहे. तंजावर छपाईच्या क्षेत्रातही प्रगत होते. कोलकाता येथील श्रीरामपूरमध्ये पहिले पुस्तक छापल्याचे दाखले इतिहासात आहेत. परंतु, त्याआधी तंजावरमध्ये छापखाना होता आणि त्यावर पुस्तके छापली जात होती.'

दुसऱ्या सत्रात मुकुंद मारूलकर यांनी संगीतकार शंकर-जयकिशन यांच्या गाण्यांवर आधारित कार्यक्रम सादर केला. विभागप्रमुख डॉ. निशा पवार अध्यक्षस्थानी होत्या.

### महिला अत्याचारांविरोधात फेरी

महिलांवर होणारी हिंसा थांबविण्यासाठी 'स्टॉप द व्हायलन्स अगेन्स्ट वुमेन' या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांची फेरी शनिवारी विद्यापीठात काढली जाणार आहे, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी दिली.

# शहाजी कॉलेजमध्ये पारितोषिक वितरण

कोल्हापूर टाइम्स टीम

शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण नुकतेच शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पार पडले. प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते.

'विद्यार्थ्यांचा कमाल वेळ मोबाइल वापरामध्ये वाया जात असल्याचे सर्वेक्षणातून सिद्ध झाले आहे. मात्र याच मोबाइलच्या तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी करावा,' अशी सूचना डॉ. विलास नांदवडेकर यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना केली. डॉ. नांदवडेकर यांच्या हस्ते यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. संस्थेचे मानद सचिव विजय बोंद्रे व्यासपीठावर होते.

प्राध्यापक व संस्थेच्या पदाधिकारी यांनी ठेवलेल्या सव्वा चार लाख रुपयांच्या ठेव रकमेच्या व्याजातून ४९ विद्यार्थ्यांना रोख बक्षीसे देण्यात आली. या वेळी संस्थेचे संचालक राजेंद्र जाधव, माजी विद्यार्थी संघाचे बाबासाहेब पाटील, सुधाकर मानकर आदी उपस्थित होते. प्रशांत पाटील यांनी स्वागत केले. प्रा. राज बिरजे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डी. के. वळवी यांनी आभार मानले.



# संस्कार, मूल्यशिक्षणावर भर हवा

## ज्योती शेट्ये; महिला अत्याचार प्रतिबंधक कायदेवर मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. १२ : महिलांवर सातत्याने होणारे अत्याचार चिंताजनक आहेत, केवळ कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही, कायद्याबरोबरच कुटुंबातील संस्कार आणि मूल्यशिक्षणावर भर देणे आवश्यक आहे, असे मत महिलांसदर्भातील कायद्याच्या अभ्यासक ज्योती शेट्ये यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे झालेल्या 'हिला अत्याचार प्रतिबंधक कायदे' या विषयावर त्या बोलत होत्या. विभागप्रमुख



**कोल्हापूर : महिला अत्याचार प्रतिबंधक कायदे या विषयावर मार्गदर्शन करताना कायद्याच्या अभ्यासक ज्योती शेट्ये.**

डॉ. निशा पवार अध्यक्षस्थानी होत्या. शेट्ये म्हणाल्या, 'महिलांना कायद्याचे संरक्षक कवच आहे. कुटुंबापासून ते सार्वजनिक कामाच्या ठिकाणांपर्यंत सर्वत्र महिलांना कायद्याने अभय दिले आहे. महिला व मुलींवरील अत्याचार थांबावेत, यासाठी महाविद्यालये, विद्यापीठे तसेच अन्य संस्थांमध्येही अनेक उपाययोजना केल्या आहेत. एवढे करूनही समाजात महिला असुरक्षित आहेत. केवळ कायदे केले म्हणून हा प्रश्न निकालात निघेल, असे नाही. यासाठी कुटुंबापासून त्याची सुरुवात होणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी असा भेद करणे सर्वप्रथम थांबले पाहिजे. मुलीला समान दर्जा मिळत नाही, तोवर या प्रश्नाची तीव्रता कमी होणार नाही.'

त्या म्हणाल्या, ''भारतीय समाजातील मूल्यव्यवस्था टिकवून ठेवणे आवश्यक आहे. यासाठी मूल्यशिक्षणावर भर दिला पाहिजे. महिलांना आदराचे स्थान मिळवून देण्यासाठी कायद्यापेक्षा मूल्यशिक्षण प्रभावी भूमिका बजावू शकेल.'' या वेळी डॉ. सुमेधा साळुंखे आदी विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.



# हिंगणघाट निर्भयाला आज वाहणार आदरांजली

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : हिंगणघाट येथील प्राध्यापक तरुणीवर झालेला क्रूर हल्ला आणि त्यानंतर तिला गमवावा लागलेला जीव ही घटना महाराष्ट्राला काळिमा फासणारी आहे. या घटनेतील दोषींना फाशी देण्याची मागणी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने केली आहे. दरम्यान,निर्भयाला आदरांजली वाहण्यासाठी गुरुवार (ता. १३) दुपारी दोन ते अडीच या वेळेत आदरांजली सभा होणार आहे. त्यानंतर विद्यापीठाच्या मेन गेटवर निषेध सभा होईल, त्याला सर्वांनी उपस्थित रहावे.